महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित

**लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय**

पचंवटी . नाशिक - ४२२ ००३

पुणे विद्यापीठ संलग्न क्र.पी.यु/एन.एस./ए.एस.सी./०१८(१९७१)

(NAAC Reaccredited 'A' Grade)

कार्यालय : २५१२१२४, २६२८२३३ फॅक्स (०२५३) २५१२१२४

Web : www.lvhcollege.com Email : lvhcollege@gmail.com

प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर

संस्थापक



कर्मवीर भाऊसाहेब हिरे

दिनांक : ०६/०८/२०२०

# सूचना

**(जूलै २०२० च्या प्रथम ते अंतिमपूर्व निकालातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी / Performance Improvement साठी इच्छुक विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या अर्जाबाबत)**

विद्यापीठाच्या परिपत्रक क्र. ९३ व ९४ दि. १६/०५/२०२० मधील ब(४) मध्ये नमूद केल्यानुसार जूलै २०२० परीक्षेच्या निकालानंतर विद्यार्थ्यांना Performance Improvement हवी असल्यास त्याकरिता पुढील सत्रामध्ये संधी देण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आलेला होता. सदर तरतूदीनुसार ज्या विद्यार्थ्यांना जूलै २०२० (उन्हाळी) प्रथम ते अंतिमपूर्व निकालामधील लेखी परीक्षेच्या विषयांना Performance Improvement हवी असेल त्यांच्याकरिता विद्यापीठाकडून स्वतंत्र परीक्षा हिवाळी सत्राच्या (October २०२०) परीक्षेपूर्वी आयोजित करण्यात येणार आहे. जेणेकरुन या विद्यार्थ्यांपैकी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना हिवाळी सत्र २०२० (October २०२०) च्या परीक्षेचे अर्ज भरण्याची संधी उपलब्ध होऊ शकेल. याकरिता जूलै २०२० च्या प्रथम ते अंतिमपूर्व परीक्षांच्या निकालानंतर Performance Improvement साठी इच्छुक विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, लेखी परीक्षेच्या विषयांचे परीक्षा अर्ज खालील नियमांच्या आधिन राहून नव्याने भरावयाचे आहेत, याची नोंद घ्यावी.

१) Performance Improvement साठी सदर परीक्षा अर्ज भरतांना ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी २०२० (मार्च/एप्रिल २०२०) च्या परीक्षेचे अर्ज भरलेले आहेत व विद्यार्थ्यांच्या ज्या विषयांना गणितीय सूत्रांचा वापर करुन गुण प्रदान करण्यात आलेले आहे, त्याच विषयांना Performance Improvement ची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२) सदर Performance Improvement च्या परीक्षेकरिता कोणतेही परीक्षा शुल्क आकारण्यात येणार नाही.

३) उन्हाळी २०२० (मार्च/एप्रिल २०२०) च्या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी पहिल्यांदाच (Fresh) परीक्षा अर्ज केले आहेत व ज्यांचे गुणदान हे गणितीय सूत्रानुसार केलेले आहेत, अशाच विद्यार्थ्यांना कमीत कमी एक व जास्तीत जास्त सर्व लेखी परीक्षेच्या (Theory) विषयांकरिता परीक्षा अर्ज भरता येतील.

४) सदर परीक्षा अर्ज भरुन देण्यासाठी कालावधी खालीलप्रमाणे असेल. :-

अ) ज्या परीक्षांचे निकाल ३१/०७/२०२० पर्यंत जाहिर झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत दि. ०६/०८/२०२० ते १६/०८/२०२० (१० दिवस).

ब) ज्या परीक्षांचे निकाल दि. ०५/०८/२०२० नंतर जाहिर करण्यात येतील त्यांच्यासाठी परीक्षा अर्जाची मुदत निकाल जाहिर झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी सुरु होऊन पुढील १० दिवस असेल.

५) **सदर परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची Performance Improvement ची परीक्षा झाल्यानंतर त्यांना मिळालेले गुण/निकाल हे त्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी २०२० (मार्च/एप्रिल २०२०) च्या परीक्षेचे गुण/निकाल समजण्यात येईल.**

६) **सदर परीक्षेस Special Examination ची सुविधा लागू राहणार नाही.**

७) **जे विद्यार्थी Performance Improvement करिता अर्ज करतील त्यांना उन्हाळी २०२० (मार्च/एप्रिल २०२०) चे गणितीय सुत्रानुसार गुणदान केलेले गुणपत्रक न देता Performance Improvement ची परीक्षा झाल्यानंतर तयार होणाऱ्या निकालानुसार एकच गुणपत्रक देण्यात येईल.**

८) **जे विद्यार्थी Performance Improvement च्या परीक्षेमध्ये ज्या विषयाची निवड करणार नाहीत, त्यांचे त्या विषयाचे पूर्वीचेच (गणितीय सुत्रानुसार निश्चित केलेले) गुण ग्राह्य धरण्यात येतील.**

L.V.H. Arts, Sci. & Commerce College Panchavati, Nashik-3.

(डॉ. सी. जी. दिघावकर)
प्राचार्य
लोकनेते व्यंकटराव हिरे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
पंचवटी, नाशिक-३.